
संत झेवियर्स महाविद्यालय
मराठी वाङ्मय मंडळ

# तेजोमय २०१९



## मुंबई - BOMBAY - बंबई

# तेजोमय

**संपादक:**
हर्षदा अभ्यंकर

**साहित्य विभागप्रमुख:**
दुर्गा येसादे

**अनुवाद:**
जान्हवी देशपांडे
तिर्थांगी कुलकर्णी

***मांडणी-सजावट:***
पुलकिता मयेकर

तेजोमय हा अंक मराठी वांग्मय मंडळातर्फे २५ नोव्हेंबर २०१९ रोजी प्रसिद्ध झाला आहे. या अंकातील सर्व मतांशी संपादक सहमत आहेत असे नाही. सर्व हक्क प्रकाशकाधिन.

अभिप्रायासाठी संपर्क:
mvm.xaviers20@gmail.com

# अनुक्रमणिका

१) संपादकीय - हर्षदा अभ्यंकर
२) मासेमारी आणि माणुसकी - दुर्गा येसादे
३) मुक्कामपोस्ट मुंबई- डॉ. प्रशांत रत्नपारखी
४) एक मुलाकात हकिकत से - विश्मिथा रोझ डिसूजा
५) एक शहर, अल्टर केलेलं, फक्त तुमच्यासाठी - कृष्णा सावंत
६) मुंबईचे ईस्ट इंडियन्स - शॅरिन मिस्किटा
७) बॉम्बे - गायत्री ओक
८) एक प्रवास- वैदेही नानिवदेकर
९) City Library - ईरा घोष
१०) पत्र - तीर्था सामंत
११) ऑफिशियल ह्यूमन्स ऑफ बॉम्बे - मालविका पिल्लई
१२) अरे आवाज कोणाचा? मुंबईचा! - राधा पर्वते
१३) विस्मरणात गेलेली नावांमागची कहाणी - शॅरिन मिस्किटा
१४) डोंबिवली - सीएसएमटी - डोंबिवली - कार्तिकी अरकल
१५) शब्दशोध
१६) मुंबई एक स्वप्ननगरी - निखिल कोलते
१७) ती सुवर्णनगरी- ऋतुजा काळे
१८) तेजांकित

# संपादकीय

दिवाळी आणि दिवाळीचा प्रत्येक घटक हा अगदी आनंद, उत्साह आणि भरभराटी घेऊन येतो. आणि ह्यात देखील मराठी साहित्याचा ठसा उमटवायला दिवाळी अंकांची परंपरा जुनी आहे. कोणत्याही गोष्टीला साहित्याची झालर जोडली की ती आधिक उठून दिसते.

हीच परंपरा जोपासत, संत झेवियर्स महाविद्यालयाचे मराठी वाङ्मय मंडळ 'तेजोमय' हा दिवाळी अंक ( ह्याचे काम प्रामुख्याने दिवाळीच्या सुट्टीत होते म्हणून तेजोमयचा उल्लेख दिवाळी अंक असा केला जातो) सातत्याने प्रकाशित करत आहे. ९६ व्या वर्षात पदार्पण करताना, तेजोमय ह्या विशेष अंकाचा विषय हा 'मुंबई- Bombay- बंबई' हा आहे.

मुंबईने सर्वांना सामावून घेतले आहे आणि नेहमी खुल्या हातानी लोकांना दिले आहे. अश्या मुंबईचा गौरव म्हणून तेजोमयच्या माध्यमातून मुंबई आणि मुंबईकरांच्या भावना उलगडणारे लेख, कविता, कथा, मुलाखती आम्ही प्रस्तुत करू इच्छितो. अंकात आम्ही मुंबईच्या लाडक्या कोळी काकांची मुलाखत घेतली आहे आणि त्याचबरोबर शब्दकोडी, मुंबईतील आकर्षणांची यादी यांचा समावेश केला आहे. कविता ह्या मराठी बरोबरच इंग्रजी व हिंदी भाषेत व्यक्त केल्या आहेत कारण काही भावनांचे भाषांतर होऊ शकत नाही.

लेखांचा आणि उद्यांमुख कवितांचा आदर करत आणि जसाच्या तसा त्यांच्या प्रयत्नशील साहित्याचा मतितार्थ जपत, मी, हर्षदा अभ्यंकर, म. वा. म ची संपादिका आपल्या समोर तेजोमय २०१९ सादर करते.

माझी सहकारी दुर्गा येसादे, मंडळातील इतर सदस्य, लेखक आणि कवी मित्र परिवार यांचे आभार मानते ज्यांच्यामुळे अंकाची जडणघडण शक्य झाली.


मला आशा आहे की अंकाचे वाचन हे तुम्हाला आनंददायी मुंबईची सफर घडावण्यास यशस्वी ठरेल.

खूप खूप शुभेच्छा!

*-हर्षदा अभ्यंकर,*
*(संपादिका)*

# मासेमारी आणि माणुसकी

‘मी हाय कोली’, ‘वेसावची पारू’, ‘या कोलीवाडयाची शान’, अशा असंख्य कोळीगीतांमधून मुंबईकरांना माहीत असलेला कोळी समाज. कोळी म्हणजे मुंबईचे आद्य नागरिक. पूर्वीच्या सात बेटांवरच्या वरळी बेटावर स्थित असलेल्या या समाजाच्या खाद्यसंस्कृती, परंपरेने मुंबईची खरी ओळख. याच संस्कृतीच्या पाऊलखुणा शोधत आम्ही येऊन थडकलो वरळी कोळीवाड्याच्या अरुंद गल्ल्यांमध्ये. तिथल्या एक मजली घरात राहतात ८० वर्षीय कृष्णा शांताराम चंदू नाखवा,ज्यांच्या चार पिढ्या मासेमारीच्या व्यवसायात आहेत. कृष्णाआजोबांशी केलेल्या गप्पाटप्पांमध्ये आम्ही त्यांच्या व्यवसायाशी निगडित अधिक आठवणींना उजाळा दिला. या संभाषणातले काही स्मरणीय क्षण:



**तुम्ही सांगितल्याप्रमाणे तुमच्यात चार पिढ्या मासेमारीच्या व्यवसायात होत्या. तुमची मासेमारीची आवड ही परंपरेने जन्मली की तिला वेगळी कारणे होती?**

मच्छीमारांना गाव नसतो, जिथे राहतो तोच आमचा गाव. आधी माझ्या कुटुंबाचा छोटा वल्हयाचा धंदा होता. त्यावेळी गरिबी होती, माशाला जादा भाव नव्हता. वयाच्या आठव्या वर्षापासून आवडीपोटी छोटी-मोठी मासेमारी करत पुढे जाऊन स्वतःच्या हिमतीवर मी धंदा मोठा केला, स्वतःची बोट बांधली. माझी बोट गीतांजली ‘मरते दम तक’ या चित्रपटात सुद्धा झळकली आहे.

त्या काळात दहावी पास होऊन मी माझी आवड जोपासण्यासाठी कुर्ल्याच्या न्यू आयडियल टेक्निकल इन्स्टिट्यूटमध्ये बोटीच्या ड्राफ्टमनशीप चा कोर्स केला. पुढे सातपाटीला डिझेल मेकॅनिक्सचे प्रशिक्षण सुद्धा घेतले. माझ्या कामाने खुश तिथल्या होऊन डायरेक्टरने मला माझं इंजिन्सचं ज्ञान योग्य ठिकाणी वापरण्यासाठी प्रोत्साहन सुद्धा दिलं. पालघरच्या मंडळींचा माझ्यावर बराच प्रभाव पडला.

**कोळी समाज त्याच्या खाद्यसंस्कृतीसाठी, जगावेगळ्या परंपरांसाठी,उत्सवांसाठी नावाजलेला आहे. काळाच्या ओघात या संस्कृतीत काही बदल झाले आहेत का?**

खरं सांगायचं झालं कौटुंबिक प्रश्न सोडवता सोडवता बाहेरील बदलांवर माझे विशेष लक्ष गेले नाही. आधी संपूर्ण कुटुंब एकत्र मासेमारी करायचं. कालांतराने व्यवसाय वेगळे झाले,बहुतेक मंडळी कामधंदयाकडे वळली. संस्कृतीचं बोलायचं गेलं तर पोषाखामध्ये झालेला बदल तुम्हाला हमखास बघायला मिळेल. महिलांच्या पारंपारिक नऊवारी साडीची जागा सहावारीने, ड्रेसने घेतली. पुरुष मंडळींची आधी रुमाल नेसायची पद्धतही बदलली. पाण्यात पोहणे त्या पोषाखा मुळे सहज जमायचं. पण आम्ही तोच रुमाल नेसून समजा बस मध्ये चढलो तर चेष्टा व्हायची. म्हणून कोळी बांधवांनी हाफ पॅन्टी घालायला सुरुवात केली. या पॅन्टिंमध्ये ती सहजता नाहीये बरं का!

जर सणांचे विचारलं तर आमचे सर्व उत्सव-परंपरा तसूभरही बदलल्या नाहीत. मग तो आमच्या जागृत गोल्फादेवीला दाखवायचा नैवेद्य असो किंवा नारळी पौर्णिमेचा उत्सव असो. जर तुम्ही होळीच्या वेळी आलात ना तर एक डिटेल्ड फिल्म काढायला मिळेल इतक्या दणक्यात होळी साजरी होते इथे! पारंपारिक गोष्टी जशाच्या तशा होतात, फक्त या तरुण मंडळींचा गाजावाजा भरपूर वाढलाय!

**तुमचा मासेमारीचा अनुभव अनेक दशकांपासूनचा आहे. मासेमारीने एक व्यवसाय म्हणून ह्या शहरात काय बदल अनुभवले आहेत?**

असंख्य. आपण मासळीच्या जाळीचे उदाहरण घेऊया. आधी सूतीची जाळी असल्यामुळे तिला सारखं उन्हात ठेवायला लागायचं. नंतर तंबूची आणि प्लास्टिकची जाळी आली जी किमान पंधरा वर्षे तरी टिकते. यांत्रिक बोटी आल्यामुळे एकाच वेळी जास्त मासे पकडण्याची क्षमता वाढली. पण त्यामुळे छोट्या मासेमारांना मात्र नुकसानाला सामोरे जावे लागले. त्यात परदेशी तंत्रज्ञानामुळे समुद्रातील जैवविविधतेचा समतोल बिघडला, माशांची पैदास कमी झाली. आधी मासेमारांची संख्या कमी होती. पुढे लोकसंख्या वाढल्याने, मुंबईच्या आधुनिकीकरणामुळे, बेरोजगारीमुळे अनेक मंडळी या धंद्याकडे वळली. मासळीचा भाव कित्येक पटीने वाढलाय. एक चांगली गोष्ट सांगायची झाली तर आधी सारं वादळ वारं अंदाजाच्या जोरावर वर्तवलं जायचं. आता माझी मुलं समुद्रावर जाण्यापुर्वी कम्प्युटरवर हवामान बघतात.

**एक कोळी म्हणून तुमचं आणि समुद्राचं नातं अतूट असतं हे तर सर्वज्ञात आहे. समुद्राने मुंबईला खूप काही दिलं पण त्याची परतफेड मुंबईने कशी केली असं तुम्हाला वाटतं?**

एका वाक्यात सांगायचं झालं तर मुंबईने समुद्राला वाताहत दिली. बळावलेल्या स्थलांतरामुळे अनेक स्थानिक प्रश्न निर्माण झाले, जसं सांडपाण्याचा प्रश्न. आमच्या मासेमारीच्या ठिकाणाजवळच समुद्रात तीन किलोमीटर आत गटारलाईन सोडली आहे. या दूषित पाण्यामुळे मासेमारीवर कसा प्रभाव होतो हे सांगायला नको. आता मासेमारी सलग न होता सीजनल होते. त्यात भर पडली आहे विविध विकास प्रकल्पांची. आमचा विकासाला विरोध नाही पण त्याच्या नावाखाली तुम्ही एका समाजाचं अस्तित्व धोक्यात घालू शकत नाही. मी स्वतः प्रकल्प विरोधी आंदोलनात सहभागी झालो आहे, कार्यालयांच्या फेऱ्या घातल्या आहेत. काहीही झालं तरी मुंबईला, मुंबईकरांना ही बाब ध्यानात ठेवायला हवी की समुद्राचे काही नीतिनियम असतात जे पाळले गेले नाहीत तर आपल्याच भविष्याला धोका निर्माण होईल. त्यामुळे वेळीच पावलं उचलायला हवी.

**शेवटी कोळी समाजाचे प्रतिनिधी म्हणून तुम्हाला मुंबईकरांना काय सांगावेसे वाटेल? तुमच्या सागरासारखा अथांग अनुभवातून कोणती शिकवण देता येईल?**

आम्ही शिकवणारे कोण! मी आधी सांगितल्याप्रमाणे समुद्राचा ऱ्हास थांबवणे गरजेचं आहे आणि त्यासाठी योग्य पावले उचलण्यासाठी एकमेकांचं सहकार्य हवं. फक्त इतकं कळकळीने सांगावसे वाटतं की आपल्यातली माणुसकी जपण्यापेक्षा आयुष्यात महत्त्वाचं काही असू शकत नाही. मग ते बुडणाऱ्याला वाचवणं असो किंवा दैनंदिन जीवनात एकमेकांना मदत करणं असो, तुमच्यातला माणूस जिवंत ठेवायला हवा. कोळी समाज म्हणून आम्हाला गर्व आहे पण त्यापेक्षा जास्त मुंबईकर असण्याचा अभिमान आहे. ही एकत्वाची भावना अखेरपर्यंत आपली मुंबईकरांची नाव वल्हवत ठेवणार आहे!

*- दुर्गा येसादे*

(साहित्य विभागप्रमुख)

# मुक्काम्पोस्ट मुंबई

'आपली' ह्या शब्दातच खूप आपलेपणा व अधिकार जाणवतो. अशी माणसे व अशी जागा मिळणे फार कठीण असते. मुंबई अथवा मुंबापुरी ही अशाच पद्धतीची एक आगळी वेगळी जागा आहे. किंबहुना अशी आगळी वेगळी जागा निर्माण करते.

आपली मुंबई ते आपुन कि बंबई हे अंतर फार थोड्या वेळात पार होते ह्या नगरीत. आता मुंबईचा इतिहास व त्याचे हस्तांतरण ह्या विषयावर मला प्रबोधन करायचे नाही. पण मुंबई ही सर्वांना आपली वाटते. तिची वेगळीच जादू मनामनावर ठसा उमटवून जाते- तोही कायमचा.

कधीतरी असेच काही बोल माझ्या कानावर आले की 'जो मुंबईत राहू शकत नाही तो कुठेच राहू शकत नाही.' ह्या वाक्याचा प्रत्यय आपल्या सगळ्यांना आला असेलच. मुंबापुरीत आपले घरकुल बनवण्याची इच्छा ही भारतातील सर्व लोकांना एकदा तरी चाटून जाते. रोषणाई, समुद्र, आंग्लकालीन इमारती व सिनेजगत ह्यांची भुल तर लोकांना आहेच, शिवाय श्रीमंत मुंबई, लखाखती मुंबई, बदलती मुंबई आणि सार्वभौमिक मुंबई ही जी काही पर्याप्त विशेषणे मुंबईसाठी वापरली जातात, त्यांचे आकर्षण हि कित्येक लोकांना मुंबईत चक्क खेचून आणते.

जे पोहोचले- ते रमले हे शब्दशः खरे ठरते.

मुंबईच्या वेगवान जीवनशैलीत मायेचा पांघरून शोधणारे कित्येक लोक आपल्या संपर्कात येत असतात. आपण जर नीट निरखून पाहिलं तर ही केवळ मुंबईबाहेरूनच येणारी लोकं नसून खुद्द मुंबईत राहणारी मंडळीसुद्धा आहेत. मुंबईत राहणाऱ्या माणसांचा विशेष गुणधर्म असायला हवा असा काही ठराविक लोकांचा समाज आहे. अग्रीम स्थानावर असलेला गुणधर्म म्हणजे पैसा!! मुंबईत "राहायचं" असेल तर, माणसांकडे पैसे असायला हवा. 'मुंबई ही श्रीमंतांनीच उपभोगावयाची आहे' ह्या लोकांच्या समाजाला योग्य ती समज देणारी मुंबईच आहे. ताज किंवा ट्रायडेंटमध्ये जेवता आलं नाही तरी टपरीवर वडापाव किंवा भुर्जीपाव खाणारे कित्येक सुखी प्राणी ह्या मुंबापुरीत दिसतात. पैसा नक्कीच हवा पण, तो किती हे जर स्वतःला विचारलं तर टोलेजंग इमारतींचा हेवा मुळीच वाटणार नाही.

दुसरा सर्वसामान्य मानलेला गुणधर्म म्हणजे आंग्लभाषा प्राविण्य! आता गावरान भाषेत काय अडचण आहे राव? आपल्या धमन्यांमध्ये वाहणाऱ्या मूळ भाषेचा – म्हणजेच याआपल्या माय मराठीचा वेगळाच बोल-बाला आहे. इंग्रजी भाषेचा महत्त्व मी नाकारत नाही पण मजेशीर गोष्ट अशी आहे की आपल्या मराठमोळ्या घरातल्या मुलांनासुद्धा परदेशी मावशीच जास्त आपली वाटते. नमस्काराचं स्थान आता 'हाय बेब्स' किंवा 'यो दुड' ह्या शब्दांनी घेतलं आहे. जशी मुंबई नितळ मनाची आहे, तसेच आपल्या मराठी मायबोलीचे मनही उदात्त आहे. ह्या शाब्दिक आघातांना तिने सहज सहन केले आहे, किंबहुना आपलेसे केले आहे. मुंबईचे, आधी साहेबाच्या राज्यात 'बॉम्बे' झाले होते. कित्येक वर्षे परकीय भाषेची बळजबरी आपण तोऱ्यात मिरवली मग पुन्हा 'बॉम्बे' चे 'मुंबई' झाले. तेव्हा काही जणांनी आपली नाके मुरडली. पण जे आहे ते आहे. सद्य परिस्थितीत 'मुंबई' चे 'बॉम्बे' आपलीच माणसे करू पाहत आहेत. हा आघात मात्र वर्मी लागतो. मुंबई म्हटलं की "लो क्लास" आणि बॉम्बे म्हटलं की "हाय क्लास"!!

आता समारोप घेताना सांगायची बाब म्हणजे, मुंबईला अनेक लोकांनी गृहीतच धरले आहे. पण मुंबई आणि मराठी भाषा यांची एक स्वतंत्र गरीमा आहे, बाज आहे. मुंबई म्हणा, बम्बई कि बॉम्बे – ह्याने काही फरक पडणार

नाही. मराठी भाषा व मुंबईचा गौरव काही अशा आघातांनी लोप पावणार नाही.

मी मुंबईकर आणि मी महाराष्ट्रीय हा अभिमान, ही ऐट कधीच जाणार नाही. लोकांनी या गोष्टीची पण जाण ठेवावी की ज्या मातीत आपण रुजतो, त्या मातीचं, आपल्या मुंबईचं ऋण कधीच फिटणार नाही. मुंबईचा मान आणि अभिमान हा केवळ भारतातच नव्हे तर जगानेही जाणला आहे आणि मानतही आहेत. मला आपल्या मुंबईचा अभिमान आहे.

मुंबईला आणि मुंबईच्या मातृत्त्वाला माझा मानाचा मुजरा.

***- डॉ. प्रशांत रत्नपारखी***
***लाइफ सायन्स आणि बायोकेमिस्ट्री विभाग***

# एक मुलाकात हकीकत से!

मंजिल सबकी अलग है,
पर रास्ता सबका एक।
आमदनी सबकी अलग है,
पर खर्चे सबके ज्यादा है।
पेशा सबका अलग है,
पर सफर करते सब साथ हैं।
सब एक दूसरे से अनजान है,
पर बेफिक्र साथ बैठते हैं।
यह जिंदगी का ज्ञान नहीं जनाब,
यह तो मुंबई की लोकल ट्रेन है!

***-विश्मिथा रोझ डिसूजा***
***प्रथम वर्ष,कनिष्ठ महाविद्यालय ,कला शाखा***

# एक शहर, अल्टर केलेलं, फक्त तुमच्यासाठी

जुन्या वैशिष्ट्यपूर्ण गॉथिक स्थापत्याने सजलेले, बेभान पाऊस - काहींच्या आवडीचा, काहींच्या नावडीचा - अशा पावसात बेधूंद भिजणारे आणि अनेकांच्या भावनांचे रेशीमबंध जोडलेले असलेले शहर म्हणजे मुंबई - एक अशी नगरी जिचं अनेकांच्या भावविश्वात एक शाश्वत स्थान आहे आणि जिने अनेकांच्या आयुष्यावर प्रभाव टाकला आहे, आणि मला वाटतं हे शहर असं आहे कारण ते प्रत्येकासाठी वेगळं आहे आणि तरीही कुठेतरी या वेगळेपणातही एक सामायिक अनुबंध आहे... जसा की एखादा ड्रेस, जो सर्व आकार प्रकारात उपलब्ध असतो आणि तोच ड्रेस एखाद्या व्यक्तीच्या मापाने अल्टर केला जातो, फक्त त्या व्यक्तीला फिट बसण्यासाठी!

ज्या शहरात मी लहानाची मोठी झाले त्या "बॉम्बे" शहराचं माझ्या आयुष्यातलं स्थान नेहमीच निव्वळ शहर याहून कितीतरी जास्त होते. हे शहर माझ्या वेदनांवरचं औषध होतं, आणि या शहरातली माणसं माझ्या तीर्व संवेदनांना वाट करून देण्याची एक विश्वासाची हक्काची जागा. बॉम्बे शहरात जवळपास १८ वर्ष राहिल्यानंतर एक गोष्ट मी नक्कीच सांगू शकते, इथे प्रत्येक दिवस नेहमी उत्तमच सुरू होईल असं नाही आणि प्रत्येक दिवस आपण प्लॅन करू तसाच जाईल असंही नाही; कारण तुम्ही तुमचा दिवस कितीही लवकर सुरू करा, तुमच्या वेळेचं गणित इथला मान्सून कधीही चुकवू शकतो. जर तुम्ही इथल्या लोकल ट्रेनने प्रवास करत असाल तर तुमची पूर्ण दिनचर्या एम्-इंडिकेटर ॲपभोवती फिरते आणि एक प्रश्न जो कायम तुमच्या डोक्याला चक्रावून टाकत असतो तो म्हणजे, "जर मी ही सोडून पुढची फास्ट लोकल घेतली तर मला निदान नीट उभं रहायला तरी जागा मिळेल का?" लोकं तुमची जराही पर्वा न करता ढकलाढकली करतात, धक्के देतात आणि त्यावेळी तुम्ही मात्र येती रविवारची सुट्टी शहराच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या ठिकाणी घालवण्यासाठी मेगा ब्लॉक टाळून कसं पोहोचायचं याचा विचार करत असता. थोडक्यात काय तर बॉम्बेच्या या धावपळीच्या जगात प्रत्येक जण खरं तर त्याच मार्गाने चालत असतो ज्या मार्गावरून तुम्ही चाललाय, मात्र या गर्दीतही प्रत्येकाचं ध्येय वेगळं, उद्दिष्ट वेगळं, जे पाहून आपण विस्मयचकित होऊन जातो.

काहीच महिन्यांपूर्वी मी या शहराच्या अथांग जाळ्यात अडकून हरवलेय की काय असं मला वाटून गेलं होतं. या शहराप्रती असलेल्या माझ्या आत्मियतेच्या भावनेला काही लोकांच्या विचित्रपणाचं गालबोट लागलं होतं आणि त्यावेळी मला फक्त तिथून माझी सुटका हवी होती, बस्स आणखी काही नाही. मी तिथून बाहेर पडण्याचे माझ्या बाजूने सर्वतोपरी प्रयत्न करत होते आणि प्रत्येक वेळी हे शहर त्याचे अदृष्य जादूई दैवी हातांनी मला घट्ट आपल्या मिठीत घेत होते, अपयशाच्या महासागरात माझं धैर्य विरघळून जाऊ नये यासाठी मला सतत प्रोत्साहन देत होते, ते माझ्यासाठी त्यातून बाहेर पडण्याचा मार्गच आखत होते आणि जणू मी हार मानू नये म्हणून मला आर्जव करत होते.

गंमत अशी की हा तोच अराजक, गोंधळ आणि लोकांचा गजबजाट ज्यात मी हरवले होते आणि अशा परिस्थितीतही तोच माझं सांत्वन करत होता.

माझ्या अनुभवांच्या काट्यांच्या बोचणीतून मी शिकले की इथे भेटणारी प्रत्येक व्यक्ती "मित्र"

नसते. काहींची ती कुवतच नसते तर काहींकडे तुमच्याशी मैत्री करण्याइतका वेळच नसतो. पण इथे प्रत्येकाकडे देण्यासाठी काही ना काही आहेच... मग ते रस्त्याने जात असताना एक अनोळखी व्यक्तीकडून मिळालेलं स्माईल असेल किंवा तुम्ही रोज सकाळी ट्रेनमध्ये जिच्या शेजारी बसता त्या महिलेकडून एक चमचाभर पोहे असतील, आणि देण्यात त्यांना कसलीही कसूर वाटत नाहीच, तुम्हाला फक्त "कसं घ्यायचं" हे कळलं पाहिजे. माझ्या अवतीभवतीच्या प्रत्येक व्यक्तीने, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे मी आज जी आहे ते घडवण्यात मोलाचं योगदान दिलं आहे. सतत कुठल्या ना कुठल्या फोन कॉलमध्ये व्यस्त असणाऱ्या त्या वर्कोहोलिक महिलेकडून मी शिकले की व्यावसायिक आव्हानांना कसं समर्थपणे तोंड द्यावे आणि इतर कुठल्याही प्रलोभनांपेक्षा आपल्या आयुष्यातल्या महत्वाच्या गोष्टींचं प्राधान्य कसं ठरवावं; तिने मला माझ्या आयुष्यातल्या मूलभूत गोष्टींच्या पुनर्बांधणीसाठी प्रवृत्त केलं. मोठं पोट सहज पेलणाऱ्या त्या लंबोदर व्यक्तीने आपल्या पोटाची जराही लाज न बाळगता जणू मला निक्षून सांगितलं, "हे माझ्या पत्नीच्या हातच्या प्रेमळ अन्नाच्या तृप्तीचं द्योतक आहे". त्याने मला दाखवून दिलं की निखालस परिपूर्ण नसलो तरी ठीक, आपण आनंदी आणि समाधानी असणं खूप महत्वाचं आहे. बहिरेपणा येईल इतके सतत कानात हेडफोन घालून बसणाऱ्या त्या टिनेजरकडे पाहून मी शिकलो की शाश्वत आयुष्यापासून फारकत घ्यावीशी वाटण्यात चूक काहीच नाही, प्रत्येकाकडेच अशा अनेक गोष्टी असतात ज्या त्यांना स्वतःच्या मनाच्या कुपीत दडवून ठेवायच्या असतात. हातात लाल रंगाच्या किणकिणत्या बांगड्या घातलेल्या नुकतंच लग्न झालेल्या त्या मुलीला कानात इअरफोन्स घालून आणि चेहऱ्यावर प्रेमाची लाली चढवून आपल्या नवऱ्याशी बोलताना पाहिल्यावर "प्रेम अजूनही समूळ संपलेलं नाही या जगातून" याची खात्री पटली. मला वाटू लागलं की जणू हे सारे लोक निव्वळ माणसं नसून ही प्रत्येक व्यक्ती एक अनुभवसंपन्न पुस्तक आहे, विशेषतः स्वत्व हरवून स्वप्नाळू डोळ्यांनी खिडकीबाहेर पाहणारी ती मुलगी - तिने मला "विश्वास ठेवायला" शिकवलं, विश्वास माझ्या आशावादावरचा, माझ्या आकांक्षांवरचा आणि या शहरावरचाही.

या शहराच्या मी पुन्हा एकदा प्रेमात पडलेय, कारण या शहरानेच मला शिकवलंय की इथे प्रत्येक गोष्टीला क्षमा आहे, मात्र स्वतःचा आत्मविश्वास हरणे आणि स्वतःया स्वप्नांवरचा विश्वास गमावणे याला इथे माफी नाही. बॉम्बे हे शहर माझ्यासाठी डोळे दिपवून टाकेल असा झगमगाट असलेली एक स्वप्ननगरी आहे. एक सदैव जागृत शहर, जे अतिशय सुंदर आहे; नाही का?

*- कृष्णा सावंत*
*प्रथम वर्ष, कला शाखा*

# मुंबईचे ईस्ट इंडियन्स

भारताची आर्थिक राजधानी असलेल्या आणि भारतातील विकसित शहरांपैकी एक असलेल्या मुंबईला स्वतःची अशी संस्कृती असेल का? सर्वांना प्रश्न पडतो की बेटं असलेल्या मुंबईत कोणती वेगळी संस्कृती असेल?

चला तर जाणून घेऊया की मुंबईचे मूळचे नागरिक असलेले कॅथलिक ईस्ट इंडियन म्हणून का ओळखले जातात. १६ व्या शतकात पोर्तुगीज भारतात आले तेव्हा त्यांनी हयात असलेल्या सर्व धर्मीय जनतेचे रोमन कॅथलिक पंथात धर्मांतरण करायला सुरुवात केली. हे कॅथलिक उत्तर कोकणी कॅथलिक म्हणून ओळखले जायचे. १७ व्या शतकाच्या मध्यात मुंबईची सत्ता ब्रिटिशांच्या हातात गेली. वाढत्या सुधारणांमुळे परदेशी लोकांचा लोंढा रोजगारासाठी इथे येऊ लागला.

आता उत्तर भारतीय कोकणी लोकांना स्थलांतरित गोवन आणि मंगलोरी कॅथलिक पासून वेगळे होऊन विशेष दर्जा हवा होता. राणी व्हिक्टोरियाच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त पोर्तुगीज कॅथलिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उत्तर कोकणी कॅथलिक नि स्वतःला ब्रिटिश राज्याशी प्रामाणिकपणा दाखवण्यासाठी ईस्ट इंडियन म्हणवून घेतले गेले. यामुळे त्यांना स्थलांतरितांपेक्षा जास्त अधिकार आणि विशेष हक्क दिले गेले.

अशाप्रकारे कोणत्याही भौगोलिक संदर्भाशी न जोडलेल्या  ईस्ट इंडियन नावाचा इतिहास आपण पहिलाच. आता आपण अजून या संस्कृतीची माहिती मिळवूयात.

ईस्ट इंडियन समाजातील काही घटक:
१) कुलवी समाज-  हे शेतकरी होते. धान्यांमध्ये ते भात जास्त पिकवायचे. त्याचबरोबर पडवळ, भेंडी, वांग, काकडी पिकवायचे. आर्थिकदृष्ट्या स्थिर असल्याने यांना सर्वोच्च स्थान होते.
२)आगरी समाज- हे मिठागरे तयार करण्याच्या कामावर होते. मीठ तयार करून ते विकणे हे त्यांचे काम होते.
३)भंडारी समाज- हे ताडी निर्माण करण्याचे काम करायचे.
४) कुंभार समाज- हे मातीची भांडी तयार करण्याचे काम करायचे.
५)धोबी समाज- वस्त्रप्रक्षालनाचे आणि त्यांना इस्त्री करण्याचे काम करायचे.
६)कोळी समाज- हे मासेमारी करायचे काम करायचे.

भाषा-  मुंबईचे हे ईस्ट इंडियन ईस्ट इंडियन बोलीतील मराठी बोलतात .

पारंपरिक पोशाख- स्त्रिया नऊवारी साडी म्हणजेच लुगडं नेसतात. पुरुष पांढरं बनियन घालतात आणि कमरेवर त्रिकोणाकृती वस्त्र नेसतात.

आगेर   (शेतीचा महोत्सव)-
हा खरंतर आभार मानण्याकरता नियोजलेला दिवस आहे. या दिवशी शेतकरी एकत्र येऊन शेतीतील भरभराटीसाठी देवाचे आभार मानतात.

पारंपरिक संगीत-
घुमट हे पारंपरिक संगीत वाद्य आहे. यात उघडे तोंड असलेल्या माठाच्या तोंडावर घोरपडीची कातडी घट्ट बांधतात.

मी लहानपणापासून मुंबईत राहते. माझी येथील संस्कृतीशी नाळ जोडली गेली आहे. माझ्या वाडवडिलांच्या येथे आठवणी आहेत. मुंबईत वसाहतवाद्यांमुळे झालेल्या विकासामुळे इथे अनेक

उद्योगांची स्थापना झाली. आज स्थलांतरितांचे लोंढे इथे येऊ लागले आहेत. विकासाच्या शोधात अनेक मूळचे नागरिक ब्रिटिशांनी स्थापन केलेल्या उद्योगांत रोजगार मिळवू लागले. त्यावेळेस आपल्या जमिनी त्यांनी विकल्या. जेव्हा हा मुंबईचा आधुनिकीकरण झालं तेव्हा आपला पारंपरिक पोशाख सोडून त्यांना पाश्चात्य पोशाख सोईस्कर वाटू लागला. सण साजरे होतात, पण त्या सणांचे महात्म्य लोकांना माहिती नसते. त्यामुळे आपल्या संस्कृतीची ओळख होण्यासाठी या समाजातील काही जुन्या पिढीतील लोक आपली सांस्कृतिक देणगी जसे नृत्य, संगीत, पोशाख, सण, भाषा, बोलभाषा आणि सर्वात महत्वाचे म्हणजे खाद्यसंस्कृती जपण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करतात.

स्रोत- वाडवडिलांच्या झालेल्या मुलाखतीतून आणि स्वनिरीक्षणातून.

*-शॅरिन मिस्किटा*


*द्वितीय वर्ष,कला शाखा*



NATURE WALK
CHARITABLE TRUST

Nature WALK Charitable Trust

FOR WILDLIFE SOUVENIR


T-Shirts


Fridge Magnets / Car Pillow Covers


Coasters

Mugs

*Product Range Includes*

- T Shirts with Wildlife Images / Paintings
- Wildlife Caps & Hats
- Key Chains
- Bags
- Mugs with wildlife images
- Wildlife Jackets

*Also contact us for Wildlife Safaris / Camps*

**Naturewalk Outdoors**

A-10, Ashok Kiran Soc., Ashok Path, # Law College Rd, Erandawane, Pune 411 004.

8007976337 / 9405435393 / 9326823052 naturewalkoutdoors@gmail.com / naturewalkoffice@gmail.com

**www.naturewalkoutdoors.com**

# बॉम्बे

हे शहर इतका मोठा इतिहास जगले आहे की आज जगात या एकाच शहराची दोन वेगवेगळ्या नावांनी स्वतंत्र ओळख आहे. काळाच्या ओघात अनेक मानवनिर्मित श्रृंखलांना तोंड देत, मनाविरूध्दचं पण तरीही प्रत्येक परिस्थितीशी जुळवून घेत हे शहर मोठं होत आलं आहे. या शहरालाही भितीच्या त्याच जाणिवा आहेत ज्या मला, तुम्हाला आहेत.

विविधं लेखक कवींनी आपल्या साहित्यकृतींमध्ये प्रतिके आणि प्रतिमांमधून रंगवलेलं या शहराचं विविधं ऋतूंमधलं आकाश त्यांच्या शब्दात पाहून पाहून हे शहर थकून गेलं आहे. शहराचा मूळ ऐतिहासिक वारसा विसरून आपलीच माणसं आपला व्रुध्द सुरकुतलेला हात सोडून या शहराच्या ऐतिहासिक वास्तूंच्या परिसरात नशा करताना पाहून पाहून हे शहर आता निराश झालं आहे.

या शहराने अनेक आश्वासने ऐकली आहेत जी कधीही पूर्ण केली गेली नाहीत; त्यामुळे आता अशा कुठल्या आश्वासनांमध्ये या शहराचा विश्वासच उरलेला नाही. हा शहराच्या मनात आता स्वतःच्या भवितव्याबाबत गतकाळापेक्षा खूप कमी आशा शिल्लक राहिली आहे. तुम्ही कागदावर आखलेले कुठलेही प्रकल्प अथवा योजना आता या शहराला भुरळ घालू शकत नाहीत; आणि हे सत्य तुम्हाला उमगण्यासाठी अजून किती वेळ हवाय याचंच या शहराला आश्चर्य वाटतंय.

रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या विविध आकार - प्रकाराच्या गाड्यांबरोबरच या शहराने आजवर याच रस्त्यांवर अनेक निषेध मोर्चेही पाहिले आहेत. अशा उद्वेग निर्माण करणाऱ्या घटना, ज्या या शहराव्यतिरिक्त क्वचितच कुणाच्या मनाला खटकल्या असतील, या शहराने निराश मनाने निमुट पाहिल्या आहेत. कदाचित या अशाप्रकारच्या आयुष्य जगण्याला तुम्ही या शहरापेक्षा अधिक उत्तम रूळले आहात की काय अशीच या शहराला भिती वाटते.

रस्त्यावरचे वाहतूकीचे दिवे बंद करून अंधारात तुम्ही या शहराचे हिरवे वस्त्र पुन्हा इथल्या हिरवाईशी कधीही जोडले जाऊ शकणार नाही इतक्या क्रूरपणे छिन्नविच्छिन्न करत असताना मुंबईने अनेकदा मदतीसाठी आक्रोश केला. जेव्हा तुम्ही त्यांचे लाल - पिवळे रंग गुन्हेगारीच्या तांबड्या मिसळत होता तेव्हा त्या अग्निरंगाची दाहकता या शहराला आतल्या आत जाळत होती. "शहराच्याच भल्यासाठी आणि सुरक्षेसाठी हा अग्निदाह आवश्यक आहे" असा तुमचा युक्तिवादही या शहराने ऐकलाय, जेव्हा की यात काहीही तथ्य नव्हतंच कधी. कदाचित हे ते पहिलं खोटं होतं जे या शहरावर थोपण्यात आलं.

या शहराची तुम्ही अचानक घडवून आणणाऱ्या बदलांशी जुळवून घेण्याची क्षमता हळू हळू कमी होत चालली आहे. थोडं सामंजस्याने स्वतःमध्ये सातत्य राखत बदलांची परिभाषा जोपासली गेली तर अधिक हितावह होईल असं या शहराला मनापासून वाटतं. कधी कधी या शहराला वाटतं की तुम्ही जसं या शहराला वागवता तसंच जर कधी या शहराने आपला मूळ स्वभाव सोडून तुम्हाला तुमच्यासारखंच वागवायचं ठरवलं तर तुम्ही या प्रकोपाला कसे सामोरे जाल?! पावसाळ्याऐवजी जर अचानक उन्हाळ्यातल्या तप्त उन्हात या शहराने त्याची गटारे एकदम उघडली आणि त्यातलं सारं सांडपाणी रस्त्यांवर आणलं तर काय होईल?! मग ही घाण तुम्ही कशी जगाच्या नजरेआड करणार? या शहराची परंपरा आणि विस्मयकारी ऐतिहासिक बौध्दिक वारसा हे सारं तुम्ही कसं मिरवणार?

या शहराचा एक एक बुरूज ढासळतोय. तुमच्या दुर्लक्षामुळे या शहराचे रस्ते अधिकाधिक रहदारीचे होत चालले आहेत. हे असं सुरू राहिलं तर एक दिवस या रस्त्यांवर उभं राहणंही अशक्य होईल. या शहराच्या हवेत व्यावसायिक मानसिकतेचा दर्प भरून आहे; मुंबईला वाटतंय जणू समुद्रही तिच्यापासून दूरावत चाललाय. तिचं दृष्य स्वाभाविक चित्र प्रदर्शित करणाऱ्या कॅमेऱ्यांच्या फ्लॅशने तिचे

डोळे दिपतात; आणि हे कॅमेरेही प्रभावी सादरीकरणासाठी तिच्या दैदिप्यमान ऐतिहासिक पार्श्वभूमीची, अनेक प्रतिकूल परिस्थितीत स्वतःला सावरत उभं राहण्याच्या तिच्या कधीही हार न मानण्याच्या मानसिकतेच्या कौतुकाची झालर लावूनच तिचं आजचं रूप प्रदर्शित करतात. आणखी किती वर्ष आपण या मुंबई शहराला स्वतःच्याच लोकांविरूध्द सुरू असलेलं हे द्वंद्व एकट्यानेच लढायला लावणार आहोत?

आपल्याच त्वचेच्या सुरकुत्यांमध्ये लपवण्यासाठी तिने तिच्या मुलांना प्रेमाने कवेत घेतलंय. ज्या प्रतिकूल जगात तिच्या मुलांनी जन्म घेतलाय ते त्यांना पहावं लागू नये, निदान इतक्यात तरी नकोच, यासाठीच तिची ही धडपड.

ती तुमच्या मानसिकतेला आणि स्वतःच निर्माण केलेल्या समस्यांमध्ये आम्ही कसे धैर्याने राहतोय या खोट्या स्वाभिमानाला कंटाळली आहे. तिच्या गल्ली बोळांमध्ये असे अनेक आहेत ज्यांना वातानुकुलित घरांमध्ये राहण्याचं आणि संध्याकाळी बातम्यांमधून शहरातल्या नव्या घडामोडी पाहण्याचं सुख नाही. अशी अनेक घरं आहेत ज्यांच्या भिंती आणि छत अनेक वर्षांपूर्वीच या शहराच्या गर्भात गाडले गेले आहेत.
ती आता तिचं निर्वाणीची भाषा बोलत आहे, त्या सर्वांसाठी ज्यांचे कान आजही तिची आर्त साद ऐकू शकतात, कदाचित तिचे हे शेवटचेच शब्द. ती तुम्हाला लवकर निर्णय घेण्याची आर्जव करत आहे, तिच्या विद्यमान वर्तमानाच्या नैराश्याची जराही सावली नसलेलं एक उज्वल भवितव्य घडवण्यासाठी विनंती करत आहे; कारण कालांतराने मुंबईने तिचं रौद्र रूप धारण केलं तर तेव्हा हे सारं करण्याची वेळ निघून गेलेली असेल.

या शहराने तुमचं खूप प्रेम अनुभलं आहे आणि तुमची अंतहिन काळजीवाहू आत्मियताही. आता वेळ आली आहे तिला आपल्यातलं थोडं सामर्थ्य प्रदान करण्याची; अविश्रांत जगणाऱ्या, अथक परिश्रम करणाऱ्या या “स्वप्नांच्या शहराचं” थोडं तरी ऋण फेडण्याची.

उठा, जागे व्हा; हीच ती वेळ.

***- गायत्री ओक,***
***प्रथम वर्ष, कला शाखा***



# एक नवा प्रवास!

**"ऐ दिल है मुश्किल जीना यहाँ
ज़रा हट के, ज़रा बच के
ये है बॉम्बे मेरी जाँ..."**

या प्रसिद्ध ओळी सिनेक्षेत्रातील उत्कृष्ट गायक असणाऱ्या मोहोंमद रफिंनी गायल्या आहेत. पण या ओळींतील सत्य प्रत्यक्षात आणण्याचं काम प्रत्येक मुंबईकर करत असतो. मला विचारा कसं? मी तुम्हाला 'विरार फास्ट' लोकल पकडण्याचा सल्ला देईन. त्यानंतरच तुम्ही माझ्याशी सहमत व्हाल.

नेहमीप्रमाणे, मी सकाळी बोरिवली रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर 'जलद चर्चगेट' लोकलसाठी थांबले होते. अचानक जी लोकल प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर येणार होती ती प्लॅटफॉर्म क्रमांक ५ वर येणार असल्याची सूचना दिली गेली. जर तुम्ही दररोज लोकलने प्रवास करणारे असाल तर मी तुम्हाला परत परत सांगू इच्छिते की तुमच्या होणाऱ्या गैरसोयी विरूद्ध तक्रार करणं हा तुमचा जन्मसिध्द हक्क आहे. मग काय, जिवाच्या आकांताने पळून मी लोकल पकडली.

खिडकीजवळ बसायला जागा मिळाल्यावर मी निःश्वास सोडला. मला गर्दीची ऊर्फ गतीची सवय होत होती. तेव्हा मला कळायला लागलं की मुंबई आता माझ्या नसानसातून वाहायला लागली आहे. त्या दिवशी असं काहीतरी घडलं की  जे प्रत्येक मुंबईकराला या मुंबई शहराशी ऊर्फ मायानगरीशी असलेलं नातं जाणवतं.

भुरळ पाडणारं स्मितहास्य आणि चतुर नेत्र असलेली एक लहान मुलगी माझ्यासमोर येऊन बसली. मी तिच्याकडे पाहून स्मितहास्य करत असतांनाच ती आपल्या गोड आवाजात मला म्हणाली, "तुला मुंबई आवडते." हा प्रश्न असूनही मला विधान असल्यासारखं वाटलं. पण मी तिला उत्तर दिलं,"ती नेहमी बदलाचा स्वीकार करते.कोणत्याही गोष्टीला जास्त काळासाठी चिकटून राहू नये हे ती शिकवते. बदलाशी जुळवून घेण्याचे प्रशिक्षण देते." ती आनंदाने मला म्हणाली, "तुला मुंबईच्या प्रवासाची माहिती आहे असा मला वाटत नाही. म्हणून मला तुला तिचा परिचय करून द्यावाच लागेल."

"अनेक ठिकाणांहून येणाऱ्या चांगल्या गुणवत्तेच्या मालामुळे मुंबई ही व्यापारासाठी सुपीक असं ठिकाण होतं. ते बंदर होतं, जिथे विविधता एकवटली. अनेक वैविध्य असलेली माणसं एकत्र आली. त्या काळी ,'विले पार्ले' एक गाव होतं. ते मुंबईतील शांततेचं ठिकाण होतं. नंतर शिक्षणासाठी उत्कृष्ट असं ठिकाण बनवलं गेलं. आपली स्वप्नं सत्यात उतरवण्यासाठी म्हणून अनेक माणसं इथे स्थलांतर करायला लागली. बांद्र्याच्या पुढच्या प्रदेशात होणाऱ्या विकसनशील प्रगतीमुळे, महाराष्ट्रीयन 'खाऊ गल्ली' मुळे, ब्रिटिश कालीन वास्तुकला यांमुळे मुंबईला शहराचं स्वरूप दिलं गेलं. त्यानंतर ट्राम, टॅक्सीज आणि मुंबईच धडधडणारं हृदय असणाऱ्या लोकल आल्या.

"कसं स्वप्नवत आहे हे! असं वाटतं मुंबई स्वप्नांनी आणि येथे स्थलांतरित झालेल्या लोकांनी वास्तवात साकारली. एक परिपूर्ण मायानगरी" मी उद्गारले. माझ्या शहराबद्दल आधी कधीच न जाणवलेल्या आनंदाची अनुभूती मला आली. " पण तो भूतकाळ होता." ती हसली आणि न जणो का, पण ती अचानकपणे मला मोठी झाल्यासारखी वाटली, एका तरुण स्त्रीसारखी.

"त्यानंतर या शहरांच पुनरुज्जीवन झालं. मुंबईत आपली सत्ता स्थापन करण्यासाठी उद्योगांनी आपली मूळं रोवायला सुरुवात केली. मिल्स सुरू झाल्या, उठावांना सुरुवात झाली, अनेक घटनांनी मुंबई हे घटनांचे शहर झाले. दरदिवशी काहीतरी घडत होतं. या शहराने केवळ सुंदेरतेचाच अनुभव घेतला नाही तर त्याबरोबरच थरकाप उडवणाऱ्या घटनांना तोंड दिलं आहे. २००५ चा पूर, २००६ चा रेल्वे स्फोट, २६/११ चा ताजवर झालेला हल्ला आणि अजून अशा अनेक गोष्टी..." मी तिच्या डोळ्यांत पाहिल्यावर मला शहराने अनुभवलेल्या वेदना, फसवणूक  दिसली. "पण, ती मुंबई आहे. ती कधीच माघार घेणार नाही." त्या लहान

मुलीने गोड स्मितहास्य केले. त्या स्मिताने मला झांशीच्या राणीची आठवण आली. भारताच्या या भूमीने आपल्या मुलांना कधीही हार न मानण्याची शिकवणच दिली आहे. "मुंबई लढली. शस्त्रांनी नाही तर तिच्यातील शक्तीने, गतीने. ती सदासर्वकाळ जागृत असते. आपलं भव्य राज्य तिने पुन्हा उभं केलं. भारताची आर्थिक राजधानी म्हणून मिळालेला किताब तिने याच कारणासाठी मिळवला आहे. ती प्रवाही आहे, जागृत आहे."

"मुंबई हे केवळ नाव नाही आहे. विद्वानांची ती भूमी आहे. आपल्यामुळे मुंबई परिपूर्ण आहे." ती खिडकीतून बाहेर पाहायला लागली आणि वाऱ्याने जसा काय प्रेमाने कुरवाळल्यासारखा स्पर्श केला तसं तिने गोड स्मितहास्य केलं. "आणि आज तू स्वप्नं जगतेस. तू तिच्या वाळूच्या किनाऱ्यावरून मोकळ्या पायाने चालतेस, तिखट मक्याचा आस्वाद घेतेस, डबल डेकर बसच्या प्रवासाची मजा घेतेस, मरिन्सच्या ऊर्फ क्वीन्स नेकलेसच्या बाजूने चालतेस, खाऊ गल्लीत हरवून जातेस, लोकलमध्ये लोकांना भांडताना पाहणाऱ्या दृष्याची मजा घेतेस..."
शेवटच्या वाक्यावर तिला हसूच फुटलं. त्या वेळी मी ती करून देत असलेल्या गोष्टींच्या आठवणींत रममाण झाले होते.

तिचं स्थानक आलं आणि स्वतंत्र स्त्री सारखी उतरण्यासाठी उठून उभी राहिल्यावर मी तिला विचारलं, "तुझं नाव काय?"
"काही जण मला मुंबई, काही जण बॉंबे, काही जण बंबई म्हणतात!"
आणि हेच अनोखं नातं आहे माझं या शहरासोबत.

***- वैदेही नानिवदेकर***
***प्रथम वर्ष, कला शाखा***

# City Library

In a city library, exist I;

Wails and pleads surround sound
Hawkers, auto wallas, beggars
Heels-clicking, no tipping
“There are too many fibbers around.”
Habits, stories are aplenty,
Purposeless threads, run through,
Seeking some common ground.
Talks are small and empty.
Disconnect, waters the thought
Leisure laces, and inaction bound
By the hope of doing the basic.
Driven, you get; drive, you rot.

A fallen Poetry book is found.
If only I was rolly and round
To escape my happy cage of bones.
Finally! Caring hands approach,
The Poet puts me back on the rack.

- ईरा घोष
प्रथम वर्ष, कला शाखा

# पत्र

प्रिय मुंबई,
घड्याळाच्या काट्यावर धावणाऱ्या तुझ्या आयुष्यात सध्या काय चाललंय विचारुन बघावं म्हटलं आणि म्हणून तुला पत्र लिहायचं ठरवलं. तुझा सहवास तसा अजून फार कमीच मिळाला आहे मला. जन्मतः मुंबईकर नसले तरी कोकणातलाच जन्म असल्यामुळे तू कायमच मला आपलिशी वाटत आली आहेस. शाळेत असतानाच ठरवलेलं मी की आयुष्यातला किमान एखादा टप्पा या स्वप्ननगरीत घालवायचा अणि हे माझं स्वप्न आज मी जगतेय याचा खूप आनंद वाटतोय.

तू ना जणुकाही जादू आहेस. या बलाढ्य आणि स्वतःला सगळ्यात जास्त हुशार आणि प्रगत समजणाऱ्या माणसाचं आयुष्य बदलण्याची ताकत आहे तुझ्यात. खरं तर तूच ताकतही आहेस; तुझ्या मातीत आसरा शोधणाऱ्या प्रत्येकाची. कोणाला झेप घेण्यास पंख द्यायला तर कोणाच्या पंखांना बळ द्यायला तू कायमच झटत आली आहेस आणि त्या प्रत्येकाची तू शक्ति आहेस आणि दुखरी नसही तुच आहेस. जसा अरबी समुद्राने तुला प्रेमाचा वेढा घातला आहे अगदी तसाच मायेचा आणि सुखाचा वेढा तू इथल्या सगळ्यांनाच घातलेला आहेस आणि याच तुझ्या गुणामुळे तुझ्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला तू स्वतःच्या प्रेमात पाडलं आहेस; मी ही त्यातलीच एक. तू पाडलेली ही प्रेमळ भुरळही खूप गोड आणि हवीहवीशी वाटते.

तुझं महात्म्य सांगावं तितकं कमीच आहे म्हणा. जगप्रसिद्ध बॉलीवूडची मायभूमी, अनेक मोठ-मोठ्या हस्तींची कर्मभूमी तर तू आहेसच पण या पलिकडे तू खऱ्या अर्थाने माणसांची आणि माणुसकीची भूमी आहेस. माणुसकीच्या सागराबरोबर तू आपुलकीचा आगारही अहेस. मुंबईतील प्रत्येक मुंबईकराला तर तू आपलंसं केलं आहेसच पण मुंबई बाहेरुन येणाऱ्या प्रत्येकाला तू क्षणात आपलंसं करतेस. मीच बघ ना. आत्ता कुठे ४/५ महिने झाले असतील तुझ्याकडे येऊन. पण क्षणभरसुद्धा पाहुण्यासारखं वाटू दिलं नाहीस मला. अगदी पहिल्या दिवसापासून.

तुझी ख्याती असलेला मुसळधार पाऊस, उंच उंच गगनस्पर्शी अश्या इमारती, गेट वे ऑफ इंडिया आणि विधानभवनापासून ते राजभवनापर्यंत पसरलेला राणीचा हार, मरीन ड्राईव्ह, जुहू आणि गिरगाव चौपाटी, वानखेडे अणि अगदी एनटिलीया आणि मन्नत पर्यंत सगळं काही पाहिलं आणि अनुभवलं. मुंबई म्हंटल्यावर हे सगळं जसं डोळ्यासमोरुन गेलं. तुला हे पत्र लिहित असताना तसंच २००५ चा पूर किंवा २६/११ चा हल्ला सुद्धा विसरता येत नाही गं अजून. काही जखमा कितीही म्हटलं तरी नाही निघून जात. असो, वाईट आठवणींना जास्त उजाळा नको कारण तू तर स्वप्ननगरी आहेस आणि स्वप्नांमध्ये ती ताकत आहे जी भविष्य बदलून उज्वल बनवू शकते आणि तो दिवस नक्कीच लांब नाही जेव्हा खडतर भूतकाळावर मात करून फक्त भारताच्याच नव्हे तर संपूर्ण जगाच्या नकाशावर तू एक स्वतःचं एक महत्त्वाचं स्थान निर्माण करशील. तुझंच कौतुक तुझ्याकडे किती करणार? इतकं सगळं लिहिलं पण तुझी चौकशी करायची राहूनच गेली. काय म्हणतेस तू? आमच्याकडून काही त्रास तर होत नाही ना तुला? अर्थात त्रास दिला आम्ही तरी निसर्ग नियमाप्रमाणे आमचंच नुकसान होईल याची जाणीव आहे आम्हाला. त्यामुळे तुला हानी होणार नाही याची शक्य तितकी काळजी आम्ही सगळेच घेतोय.

लिहिण्याच्या ओघात वेळेचं भानच नाही रहिलं बघ. विसरले मी की तुझ्याप्रमाणे मलाही घडयाळाच्या काट्यावर चालायचय. निरोप घेते पण शेवटी एकच सांगते की माझं आणि तुझ्याकडे येणाऱ्या प्रत्येकाचं तुझ्यावर नितांत प्रेम आहे आणि आम्हाला तुझा सार्थ अभिमान आहे! तू 'आमचीच' नाही तर खऱ्या अर्थाने 'आपली मुंबई' आहेस!!

तुझी,
तीर्था.

*- तीर्था सामंत*
*प्रथम वर्ष, कला शाखा*

# OFFICIAL HUMANS OF BOMBAY:

मुंबई शहर अनेक अगम्य विरोधाभासांनी भरलेलं शहर आहे; हे एक असं शहर आहे जे खरं तर स्वप्ननगरी म्हणून ओळखलं जातं, पण प्रत्यक्षात मात्र ते कायम जागंच असतं. ज्यात सगळ्या संस्कृती वितळून एकजीव होतात असा मेल्टिंग पॉट, असा स्वर्ग जिथे अनेकांच्या आशा - आकांक्षांना आश्रय आहे, जे आपला आनंद इतरांना देण्यासाठी कायम सर्वांचं स्वागतच करतं. एक कायम गजबजलेलं शहर, जिथे तुम्ही आपल्या मातृभूमीपासून शेकडो मैल दूर असूनही तुम्हाला घरच्यासारखं वाटेल. असं काय अद्वैत आहे जे या शहराला अद्वितीय बनवतं? असं काय आहे या शहरामध्ये जे पाहणाऱ्याला प्रथमदर्शनीच विस्मयचकित करतं? या शहराचा जुना सांस्कृतिक वारसा जपणाऱ्या “Official Humans of Mumbai” यांखेरीज या शहराच्या महानतम व्यक्तिमत्वाशी आपली जवळीक निर्माण करणारे दुसरे कुणी असूच शकत नाहीत!



मी? मी तोच, सुप्रसिध्द बांद्रा - वरळी सी-लिंक, शहराच्या आश्चर्यांमध्ये जोडला गेलेला नवीन अध्याय. मी अभियंत्यांचं कौशल्य आणि निर्माणकर्त्यांची हुशारी याची फलश्रुती आहे. मी मुंबईकरांच्या भरभराटीचं प्रतिक आहे. अनेक वर्षांपासून आपली “कल्पक जुगाडू” अशीच ओळख आहे आणि त्याचं माझ्याहून उत्तम उदाहरण ते कुठलं? मला जरूर भेट द्या, चंदेरी केबल्समधून जात असताना वाऱ्याशी स्पर्धा करा, आणि अनुभवा बांधकाम स्थापत्यशास्त्रातली माझी भव्यता आणि प्रासादिकता. माझ्या शहराची तुमच्या मनाला भूरळ पडल्यावर तुम्हाला इथून कधीही परत जावसंच वाटणार नाही!

हॅलो मंडळी! मी भव्य गेटवे ऑफ इंडिया बोलतोय. मी अक्षरशः या शहराचा मुकुटमणी आहे. मुंबई आज जी आहे तशी होण्याआधीपासून माझं माहेरघर आहे. मी आणखी काय बोलू?! शहराच्या प्रवेशद्वारापाशी उभा असलेला मी गेल्या कित्येक वर्षात इथल्या रहिवाशांच्या आणि शहराच्या सुहृदाचा मी साक्षी आहे. या शहराचा पितामह या नात्याने या शहराचं सौंदर्य छिन्नविच्छिन्न करणाऱ्या २६/११ चा अतिरेकी हल्ला पाहून मला फार यातना झाल्या, पण त्यानेही इथल्या लोकांचं मन डळमळीत झालं नाहीच. फिनिक्स पक्षाप्रमाणे या शहराने पुन्हा उभारी घेतली आणि राखेतून स्वतःचं नवनिर्माण केलं. हाच तो या शहराचा चेहरा जो माझ्या मनात कायमस्वरूपी घर करून आहे... मुंबईकर, मी आपल्या ऐक्याच्या भावनेचं प्रतिक आहे.






असं काय आहे जे या शहराला गतिशील ठेवतं? मीच ती, मुंबईकरांची लाईफ-लाईन, रेल्वे. रोज लाखो शहरवासी माझ्यातून प्रवास करतात आणि अर्थातच मी प्रचंड गर्दी आणि गजबजाट यासाठी कुप्रसिध्दही आहे. पहाटेचे चार असो किंवा दुपारचे चार, मी तुम्हाला कायम धावती दिसेन. मी घड्याळ्याच्या काट्यांशी स्पर्धा करते आणि या शहराचं चैतन्य जागृत ठेवते, लोकांना धावतं ठेवते. मी या शहराच्या हृदयाचा ताल आहे, इथल्या प्रचंड व्यस्त जगण्याचं मी प्रतिक आहे. कधी मी अडखळते, कधी उशीर येते, इथल्या लोकांच्या जीवनमानाप्रमाणे मी कधीही थांबत नाही. परिस्थिती काहीही असो, आपण मुंबईकर कधीही हार मानत नाही.

तुम्हाला सलमान खान, शाहरूख खान आणि इतर तत्सम विख्यात कलाकार माहित आहेत का? या सगळ्यांनीच माझ्याबरोबर चित्रपट केले आहेत. उत्सुकता आहे जाणून घेण्याची की मी कोण? मी फिल्म सिटी ... दर वर्षी बॉलिवूडमध्ये यशस्वी होण्याचं स्वप्न डोळ्यात साठवून मुंबईला येणाऱ्या हजारो लोकांचं मी स्वप्न पूर्ण करते. मी मुंबईकरांच्या सर्जनशीलता आणि कलात्मकतेच्या प्रतिभेचं प्रतिक आहे. तुम्हाला कधी उत्सुकता वाटलीये की बॉलिवूड हा शब्द जन्माला आला कसा? "बॉम्बे" जिथे सर्वाधिक हिंदी चित्रपट तयार होतात आणि "हॉलिवूड" जिथे अमेरिकन चित्रपटांची निर्मिती होते अशा या दोन शब्दांना एकत्र करून "बॉलिवूड" हा शब्द तयार झाला. आणि आज, मी अभिमानाने सादर करते जगातली दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी फिल्म इंडस्ट्री 'बॉलिवूड' - मुंबईच्या हृदयापासून तुमच्या हृदयापर्यंत.





अरेबिअन समुद्राच्या कठोर लाटांशी दोन हात करणारा मी संरक्षक कडा आहे, या शहराचा अभिमान, मी मरीन ड्राईव्ह "क्विन्स नेकलेस". मी मुंबईकरांच्या चिकाटीचं प्रतीक आहे. संततधार पाऊस असो वा अकाली येऊन धडकणारा पूर, आपण मुंबईकर या कशाचीही पर्वा न करता जिद्दीने प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जातो. तुम्हाला जर या शहराचं निस्सिम सौंदर्य अनुभवायचं असेल तर एखाद्या रम्य संध्याकाळी समुद्राच्या लाटांची गाज आणि आल्हाददायक शितल वारा याचा रोमांच अनुभवण्यासाठी इथे एकदा जरूर या. माझ्या ठायी तुम्हाला नक्की मिळेल तुमचा आनंदाचा कोष.

अरेबिअन समुद्राच्या कठोर लाटांशी दोन हात करणारा मी संरक्षक कडा आहे, या शहराचा अभिमान, मी मरीन ड्राईव्ह "क्विन्स नेकलेस". मी मुंबईकरांच्या चिकाटीचं प्रतीक आहे. संततधार पाऊस असो वा अकाली येऊन धडकणारा पूर, आपण मुंबईकर या कशाचीही पर्वा न करता जिद्दीने प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जातो. तुम्हाला जर या शहराचं निस्सिम सौंदर्य अनुभवायचं असेल तर एखाद्या रम्य संध्याकाळी समुद्राच्या लाटांची गाज आणि आल्हाददायक शितल वारा याचा रोमांच अनुभवण्यासाठी इथे एकदा जरूर या. माझ्या ठायी तुम्हाला नक्की मिळेल तुमचा आनंदाचा कोष.

*- मालविका पिल्लई*
*प्रथम वर्ष, कला शाखा*

# विस्मरणात गेलेली नावांमागची कहाणी

मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी आहे.भारतातील महत्वाच्या महानगरांपैकी एक असे ते शहर आहे. मुंबईत मला आकर्षित करणाऱ्या काही गोष्टींपैकी एक गोष्ट म्हणजे येथील प्रत्येक रस्ते,बाजार,स्थानक यांच्या नावांचा इतिहास. मुंबई आधी बॉम्बे नावाने ओळखली जायची. पण जेव्हा १९९५ मध्ये शिवसेना सत्तेवर आली तेव्हा त्यांनी बॉम्बे हे नाव ब्रिटिश वसाहतवादाचा प्रभाव दाखवत असल्याने बदलण्याचं ठरवलं. त्यांना मराठ्यांच्या वारशाचं दर्शन घडवून देणारं नाव हवं होतं. म्हणून मुंबादेवीबद्दलचा आदर व्यक्त करण्यासाठी 'मुंबई' हे नामकरण केलं.

या सात बेटांच्या शहराचं नामकरण कसं झालं याची गोष्ट खूप मनोरंजक आहे.या शहरावर अनेक राजांनी राज्य केले, पण अखेरीस १५३४ साली पोर्तुगीजांच्या हाती सत्ता आली. तेव्हा त्यांनी या शहराचे नामकरण 'बोम्म बाहिया' असे केलं ज्याचा अर्थ 'सुंदर उपसागर' असा होतो. पण जेव्हा ब्रिटिश व्यापरनिमित्त भारतात आले तेव्हा पोर्तुगीजांनी ठेवलेलं हे नाव उच्चरायला कठीण पडत असल्याने त्यांनी त्याचे 'बॉम्बे' असे नामकरण केलं.

अशा आणखी काही मुंबईतील काही जागांच्या नावामागची कहाणी मनोरंजक आहे. कुलाबा हे शहर मुंबईतील उच्चभ्रूंचे वसतिस्थान आहे. कुलाबा हे नाव कसे पडले हे जाणून घेणे मजेशीर आहे. खूप वर्षांपूर्वी मुंबईतील एक कोळी लोकांची वस्ती होती, तेव्हा त्यांनी आपल्या या क्षेत्राचे नाव 'कोलभट' असं ठेवलं. पण ब्रिटीशांना हे नाव उच्चरतांना कठीण पडल्याने त्यांनी याचे कुलाबा असे नामकरण केले.आज या ठिकाणी इथल्या मूळ रहिवाशांची म्हणजेच कोळी लोकांची वस्ती दिसत नाही. कारण ब्रिटिशांनी केलेल्या वसहतीमुळे हे शहर आता मुंबईचे आर्थिक शक्ती आणि उच्चभ्रूंचे शहर झाले आहे.

अजून इथे 'भुलेश्वर' नावाचा बाजारसुध्दा आहे. इथे आपल्याला हवी असलेली कोणतीही गोष्ट मिळू शकते असे लोकांचे म्हणणे आहे. हे नाव शंकरावरून पडले अशी वदंता आहे. या बाजारात अनेक वस्तू मिळत असल्याने एखाद्या माणसाला जी गोष्ट हवी आहे तीच विकत घ्यायला तो विसरतो म्हणूनही या बाजाराला भुलेश्वर असेही म्हटले जाते. भूल म्हणजेच विसरणे .

अजून एक प्रश्न पडतो की एखाद्या ठिकाणाला 'चोर बाजार' असं नाव का पडलं असावं? पण माझ्याकडे याचं मजेशीर उत्तर आहे. या बाजाराचं मूळ नाव होतं 'शोर बाजार'. इथे जेव्हा माल आणला जाई तेव्हा तो माल खरेदी करण्यासाठी लोकांची विशेषतः सकाळच्या वेळेस खूप गर्दी व्हायची. त्यामुळे शोर म्हणजे गोंधळ व्हायचा. पण ब्रिटिशांच्या हे नाव उच्चरण्याच्या पध्दतीला आपण बळी पडलो. त्यामुळे या बाजाराचे चोर बाजार असे नामकरण झाले.

दक्षिण मुंबईमध्ये स्थित असलेल्या क्रौफर्ड मार्केट चे मूळ नाव होते 'महात्मा फुले मंडई'. त्याप्रमाणेच 'भेंडी बाजार' अशा नावाचा बाजार ही आहे. इथे भेंडी या नावावरून भेंडी खरेदी-विक्री करण्याचा बाजार असा अनेकांचा समाज होतो. पण तसे नसून इथे खरतर जुन्या आणि लोखंडापासून बनवलेल्या वस्तूंची विक्री होते. याचे मूळ नाव 'Behind the Bazaar' असे होते, पण कालांतराने आपणच त्याला भेंडी बाजार असे नाव पाडले.

'Breach Candy' मजेशीर शब्द आहे ना! हा शब्द खरंतर 'बुर्ज खाडी' असा आहे. हा शब्द अरेबिक आणि हिंदी शब्दांचा संयोग करून बनला आहे. बुर्ज म्हणजे उंच इमारत आणि खाडी म्हणजे आपली खाडीच. पुन्हा तेच ब्रिटिशांना उच्चार करण्यात येणारे काठिण्य!

*- शॅरिन मिस्किटा*
*द्वितीय वर्ष, कला शाखा*

# “अरे आवाज कोणाचा? मुंबईचा!”

मुंबईकर सकाळी उठल्यापासून नानाविध आवाज झेलत असतात. एवढंच काय तर रात्री झोपतानासुद्धा कानाशी मेट्रो आणि फ्लायओव्हर कन्स्ट्रक्शनचा डास गुणगुणत असतोच. सकाळी कामावर बाहेर पडलेला मुंबईकर ट्रॅफिकमध्ये अडकलेल्या गाड्यांचा गोंगाट, कोपऱ्या-कोपऱ्यावर काम करणाऱ्या इंजिन्स, मशिन्सची मैफिल ते थेट घरोघरी होणाऱ्या देवपूजेपासून मशिदीमधल्या अजानपर्यंत मुंबईमधल्या दैनंदिन जीवनाचे सुरेल संगीत ऐकत असतो. पण ह्या सगळ्या आवाजात एक आवाज दडलेला असतो. जसं फक्त मुन्नाभाईलाच गांधीजींचा आवाज ऐकू येतो, अगदी तसाच हा अदृश्य आवाज प्रत्येक मुंबईकराला ऐकू येतो. हा आवाज प्रत्येकाला काहीतरी वेगळंच सांगतो, जीवनाचं गणित शिकवून जातो.

तर हा आवाज म्हणजे कोणतीही आकाशवाणी नसून खुद्द मुंबईचा आवाज असतो. आता तुम्ही म्हणाल ‘मुंबईचा’ आवाज? इतर कॉस्मोपॉलिटन शहरांसारखे शहर ते! ‘मुंबईचा’ आवाजसुद्धा त्यांच्यासारखाच ट्रेन, मेट्रो, मोनोरेल, विमानांच्या आवाजात मिसळून उंच भरारी घेणारा आहे. तिचासुद्धा आवाज अत्याधुनिक तंत्रज्ञान, वैज्ञानिक संशोधनासोबत ताल पकडतो. तिचासुद्धा आवाज आर्थिक - राजकीय प्रगतीचा सूर लावतो. मग मुंबईच्या आवाजाचं असं वेगळं वैशिष्ट्य काय?

मरीन ड्राईव्हच्या लाटांच्या खळखळाटामध्ये, दादर चौपाटीवर, गिरगाव चौपाटीवर फिरणाऱ्या विक्रेत्यांमध्ये, वाळूचा किल्ला करत असलेल्या लहान मुलांच्या किलबिलीत, घोडागाडीच्या लयीत बाहेरून आलेला कोणताही माणूस चटकन मुंबईचा आवाज ओळखायला लागतो. मुंबईचा हा आवाज मग त्याला इतर ठिकाणांची भेट घडवत आपलंसं करून घेतो. मुंबईची जान म्हणजेच लोकल ट्रेन त्याला आपल्या तऱ्हेनुसार चालवत खरा मुंबईकर बनवूनच सोडते. ट्रेनमध्ये होणाऱ्या सूचना, बादशहा जाहिरात, प्रत्येक स्टेशनवर होणाऱ्या अनाउन्समेंट मुंबईचा आवाज सोडता अजून कुठेच ऐकायला मिळत नाहीत. सकाळी ट्रेनमध्ये होणाऱ्या भजन- कीर्तनांपासून भोंडला आणि मंगळागौरीच्या खेळांपर्यंत मुंबईचा आवाज दैनंदिन जीवनातसुद्धा आनंद शोधायला शिकवतो. “अंदर चलो पुरा ट्रेन खाली है!” असं म्हणत रोज प्रवास करणारे मुंबईकर तिच्या सुपरफास्ट आवाजाच्या गतीची साक्ष देतात! काला घोडा, जे जे स्कूल ऑफ आर्ट, जहांगीर आर्ट गॅलरी आणि एशियाटिक लायब्ररी याठिकाणी होणारी ज्ञानाची आणि संस्कृतीची देवाण-घेवाण मुंबईच्या आवाजाला कलात्मकतेची जोड देतात, तर गेट वे ऑफ इंडिया, ताज हॉटेल तिच्या आवाजाला लाभलेला ऐतिहासिक वारसा सांगतात. मुंबईतल्या फिल्मसिटीमधून “ ये हे मुंबई मेरी जान” तर कधी “बम्बईसे आया मेरा दोस्त” अशी गाणी मंद आवाजात ऐकू येतात. कधी मुंबईचा आवाज गणेशोत्सवात ढोलताशामध्ये मिसळतो तर कधी ‘ईद मुबारक’च्या शुभेच्छांमध्ये ऐकू येतो. कधी नवरात्रीत गरब्याच्या तालावर नाचतो आणि ख्रिसमस - ईस्टरच्या सेलिब्रेशनमध्ये बागडतो.

ठिकठिकाणी चाललेली बांधकामे मुंबईच्या औद्योगिक प्रगतीची साक्ष देतातच पण त्याचबरोबर मुंबईच्या बदलत चाललेल्या वास्तवाची जाणीव करून देतात. कधी कारखान्यांमुळे होणाऱ्या ध्वनी प्रदूषणामुळे मुंबईचा आवाज बसतो, पण शेअर मार्केटच्या ओपनिंग बेलबरोबर पुन्हा सुरात येतो. मुंबईचा आवाज कधी राजकीय निवडणुकीमध्ये आपलं ठोस मत मांडतो, तर कधी आझाद मैदान, दादर आणि दक्षिण मुंबईमध्ये होणाऱ्या राजकीय मोर्चामध्ये भाग घेतो. मुंबई तिच्यावर हल्ला करणाऱ्या, तिचे नुकसान करणाऱ्या लोकांच्या विरुद्ध आपला आवाज उठवतो. २६/११ ला झालेल्या हल्ल्याचा किंवा १९९३ साली झालेल्या रेल्वे बॉम्बस्फोटांचे आवाज मुंबई कधीच विसरू शकत नाही.

पण मुंबई थांबली नाही. कारण थांबली तर ती मुंबई कुठची? असं म्हणतात मुंबई स्वप्न दाखवते



आणि ती पूर्ण करण्याची जिद्दसुद्धा देते. मग आता आपणसुद्धा याची परतफेड करायला नको का? म्हणूनच आपण आपल्या आवाजातून मुंबईचा आवाज बनतो. मुंबईचा आवाज एकसारखा असला तरी हा आवाज मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती, तमिळ, कन्नड अशा नानाविध भाषांचे मिश्रण असतो. हा आवाज कोणामध्येही भेदभाव करत नाही, कोणालाही कमी लेखत नाही. कोणताही धर्म, पंथ, भाषा यांच्या नद्या शेवटी येऊन मुंबईच्या समुद्रालाच येऊन मिळतात. मुंबई आपल्याला आधी मुंबईची रीत शिकवते आणि मुंबईची रीत बदलायलाही लावते. म्हणूनच मुंबईतला कोणताही आवाज - डबेवाले, रिक्षावाले आणि विक्रेत्यांपासून ते लोकल ट्रेन, इंजिन्स - मशीन, ट्रॅफिक जॅमपर्यंत मुंबईचा वेगळेपणा दाखवून देतो. त्यामुळे आता उद्यापासून अशा वेगवेगळ्या तऱ्हा असणाऱ्या मुंबईच्या आवाजात "गुड मॉर्निंग मुंबई!" म्हणायला तयार रहा!

*- राधा पर्वते,*
*प्रथम वर्ष, कला शाखा*


**KEMTECH IMPEX**

**Business Verticals**
**Chemicals - Raw Materials and Ingredients**
**Packaging - Plastic Caps and Closures**
**Sevices - Flooring, Tank and Structural Coating, Waterproofing**

**Address :**
**Registered Office :** C1-501, Sun Empire, S.No. 7,9(Part) Wadgaon (Bk),Sun City Road, Off Sinhgad Road, Pune - 411051
**Sales Office :** Flat no. 107, 37-1-2, Saket Apartment, Karvenagar Kothrud, Vitthal Madir Marg, Pune - 411029
**Contact No. :** +91 9923005355 / +91 7263982040
**E-mail :** kemtechimpex@gmail.com / info.kemtechimpex@gmail.com

# डोंबिवली-सीएसएमटी-डोंबिवली

स्वतःला सिद्ध करायचे असेल आणि आपल्या पायावर उभे राहायचे असेल तर सर्वप्रथम डोळ्यासमोर येणारा पर्याय म्हणजे मुंबई; ही बाब अस्वीकार करणे या जगरहाटीला आजतागायत जमले नाही. आहे. कारण मुंबईने लोकांसाठी उपजिविकेचे दालन खुले केले आहे. म्हणूनच इथे येणारी व्यक्ती कधी 'मुंबईकर' होऊन जाते हे कोणाच्या लक्षात देखील येत नाही. या भूमीत पाय ठेवणाऱ्या प्रत्येक माणसाची या मातीशी अदृश्य अशी नाळ जोडली जाते जी कोणत्या ना कोणत्या रूपात कायम असते.

या मायानगरीत छोट्या मोठ्या सर्व सुखसोयी उपलब्ध आहेत. त्यामुळेच तर मुंबईचा एक कटिंग चहा आणि तळलेल्या मिरचीवर ताव मारत खाल्लेला वडापाव स्वर्गसुख देतो. या क्षणिक आनंदासोबतच आजच्या स्पर्धात्मक युगात मुंबईला वेगवान आणि आघाडीवर ठेवण्याचे काम करते ती म्हणजे मुंबईची लोकल ट्रेन.

मुंबईचा जीव की प्राण असलेली लोकल सेवा मुंबईची लाईफ लाईन म्हणून ओळखली जाते. मेट्रो आणि मोनोरेलच्या उपलब्धतेमुळे मुंबईची वाहतूक आधुनिक झाली ही गोष्ट खरी. परंतु रोज रेल्वेस्टेशनवर जाऊन गर्दीत का होईना पण रूळावर चालणाऱ्या लोकलमधून प्रवास करण्याची मजाच काही और असते. आजही लोकल ठप्प तर मुंबई ठप्प अशी परिस्थिती निर्माण होते. आयुष्यातील अनेक प्रवासांपैकी एक म्हणजे लोकलचा प्रवास जो आपल्याला खूप काही शिकवून जातो. अर्थात या प्रवासात अनेक चढ-उतार येतात व सोबत अविस्मरणीय अनुभव आणि आठवणींची शिदोरी गाठीशी बांधून आणतात. ही सफर माझ्या शब्दांत व्यक्त करायची झाली तर ती अशी... सकाळी ८ची वेळ. पावसातून वाट काढत रेल्वे स्थानकावर पोहचून तिकीट काढले. प्रवास सुरु करण्यासाठी पुलावर चढताच दररोजप्रमाणे सकाळची आणि त्यातही डोंबिवलीची गर्दी मी पुन्हा नव्याने अनुभवत होते. प्लॅटफॉर्म क्रमांक ३वर आलेल्या गाडीमध्ये चढण्यासाठी लोकांनी केलेली घाई आणि त्यातून शांतपणे रस्ता काढणारी मी हे समीकरण वेगळेच होते. कारण एवढेच की तेव्हा मला गाडी पकडण्यापेक्षा स्वतःला सावरणे गरजेचे होते. हातातील छत्री, नुकतेच काढलेले जपून ठेवायचे तिकीट आणि ओले झालेले दप्तर व कपडे सांभाळताना माझी त्रेधातिरपीट उडाली होती. माझी आवराआवर आटपायला आणि पुढील गाडी यायला एकच वेळ झाली. पूर्ण तयारीनिशी गर्दीतून गाडीत चढले आणि समाधानाचा निःश्वास सोडला.

थोड्या वेळाने मला खिडकीची जागा मिळाली. खिडकीतून येणारा गार वारा आणि पावसाने बहरलेला हिरवागार निसर्ग यांनी तर मला कधीच दुसऱ्या विश्वात पोहचवले होते. तिथे होते ती फक्त मी आणि नीरव शांतता. अचानक बाजूने गेलेल्या ट्रेनमुळे शांततेत भंग पडला आणि मनात विचारांचा कल्लोळ माजला. क्षणात रेल्वेच्या साऱ्या आठवणी ताज्या झाल्या. एकदा दादर स्थानकावरील गर्दी पाहून पुन्हा तिथे न जाण्याची बालवयात घेतलेली प्रतिज्ञा ते तेवढ्याच गजबजलेल्या डोंबिवलीतील फलाटांवर ट्रेनसाठी उभे राहणे सारे काही आठवले.

घरापासून १५ मिनिटांवर असलेल्या शाळेची दहा वर्षे पूर्ण झाल्यावर पुढील शिक्षणासाठी दीड तासाचा ट्रेनचा प्रवास करून महाविद्यालयात जाण्याचा निर्णय माझाच होता. पुढे आयुष्यात खूप बदल होणार होते. त्यांना सामोरे जाण्यास मी सज्ज झाले

आणि त्याची सुरुवात ट्रेनच्या प्रवासाने झाली. ट्रेनच्या प्रवासाने मला खूप काही शिकवले. शिकता शिकता आणि अनुभव घेताना सगळ्या गोष्टी कधी सहज आणि सोप्या झाल्या ते समजलेच नाही.

एकदा गाडीत शिरलो की काही काळापुरते राहणार असलेल्या या नव्या विश्वात आपण फक्त आपलेच असतो. तिथे सर्वकाही वेगळे असते. त्यात आपल्याला अस्तित्व निर्माण करावे लागते; फक्त आपल्यासाठी! लहानपणी गोंडसपणामुळे सहज मिळणारी खिडकी आणि आता हिरवीगार सृष्टी बघण्यासाठी खिडकीची स्पेशल जागा मिळवताना होणारी धडपड यातील तफावत लगेच लक्षात येते. इथे आपल्याला पहिला धडा मिळतो तो म्हणजे स्वावलंबी होण्याचा; स्वतःसाठी उभे राहण्याचा. आयुष्यात पुढे या गोष्टीचा आपल्याला खूप उपयोग होणार असतो. फुलपाखराप्रमाणे संरक्षित कोषातून बाहेर पडून स्पर्धात्मक जगामध्ये वावरण्याची ही सुरुवात असते आणि आपल्या जडणघडणीत तिचे योगदान मोलाचे ठरते.

आयुष्य ही एक सदैव तरंगणारी नौका असते. आपण तिचे नावाडी असतो. ज्याप्रमाणे तरंगणारी नौका आपला एकाकीपणा दूर करण्यासाठी बेटाच्या शोधात असते; त्याप्रमाणे आपणही अशाच बेटाच्या शोधात असतो, तो म्हणजे आपला समाज जो आपल्याला आपल्या नजरेने न्याहाळायचा असतो. ट्रेनच्या प्रवासात आपण समाजाचा जवळून अनुभव घेत असतो. ही जागा विविध गोष्टींनी भरलेली असते. मनुष्यजीवनातील विविध पैलू इथे दिसून येतात. नवीन असताना आपुलकी दाखवणाऱ्या ताईंपासून थोड्याशा धक्क्यामुळे रागावणाऱ्या काकूंपर्यंत सारेच भेटतात आणि रोज अनुभवाचा नवा धडा देऊन जातात. एकाच ट्रेनमध्ये असणाऱ्या रोजच्या काकू कधी आपल्या मैत्रिणी बनून जातात ते समजतही नाही. त्यांनी आपल्याबरोबर वाटलेला खाऊ खाताना आपसूकच शाळेच्या मधल्यासुट्टीची आठवण येते. त्यांच्याबरोबर घालवलेले क्षण आजच्या धकाधकीच्या भविष्याच्या चिंतेने ग्रस्त असलेल्या जीवनात वर्तमानातील आनंद टिपण्याची उमेद देतात. या नवीन माणसांमुळे आपल्या अनुभवाची शिदोरी विस्तारत जाते. त्यात गजरा बनवणाऱ्या, स्वेटर विणणाऱ्या आणि भाजी निवडणाऱ्या काकूंची गर्दी असते ती वेगळीच!

रोजच्या जाण्यायेण्याने ट्रेन आपले नवे घर बनून जाते. चूक नसताना वाद झाला की आपल्या बाजूने बोलणाऱ्या काकू आपुलकीची ऊब देतात. एखादे वेळी अचानक टीसी आल्यावर लोकांचा उडणारा गोंधळ कायम नियमांचे पालन करण्याची आठवण करुन देतो. कॉलेजमधील बहुतांश ओळखी ट्रेनमुळेच होतात. म्हणूनच एखाद्या वेळी हा प्रवास नाही केला तर चूकचूकल्यासारखे होते. पावसात अडकलेली रेल्वे भीती व तणाव दोन्हीचा अनुभव देते. हे किस्से आई-बाबांना सांगताना त्यांच्या चेहऱ्यावरील भाव अपत्याची काळजी व अभिमान दर्शवतात.

एका गोष्टीची आवर्जून नोंद करावी ती म्हणजे इथे कुठल्याच प्रकारचा भेदभाव दिसून येत नाही. अमूकअमूक जात आणि अमूकतमूक भाषा असा फरक कधीच केला जात नाही. उलट दोन मिनिटांसाठी का होईना परंतु पाठ टेकवायला जागा मिळते. संकटाच्यावेळी धीर देणारी आपुलकीची माणसे मिळतात. अशावेळी एकात्मता दिसते. एकाच स्थानकावर उतरताना आपल्या सहप्रवाशांना एकत्र घेऊन जाताना सहकार्य व इतरांना आपल्याबरोबर घेऊन जाण्याची भावना दिसते. फर्स्ट क्लास आणि सेकंड क्लास हा वेगळेपणा असला तरी मूळ हेतू एकच असतो...आजच्या स्पर्धात्मक जगात आपली जागा निर्माण करणे व यशस्वी जीवन जगणे.


मुंबईची कॉस्मोपॉलिटन संस्कृती आणि विविधतेत नटलेली एकता यांचे पुरेपूर दर्शन लोकलच्या प्रवासात मिळते.

डोंबिवली-सीएसएमटी-डोंबिवली या प्रवासाने मला खूप काही शिकवले. नागरिकशास्त्र, व्यक्तिमत्त्व विकास अशा विषयांतून पाठ केलेले नियम प्रत्यक्षात अनुभवण्याची संधी मिळाली. स्वावलंबन, दक्षता, जगण्याची नवी उमेद.....कितीही लिहिले तरी ही यादी पूर्ण होणार नाही. "माणूस जीवनाच्या प्रत्येक टप्प्यात शिकतो", असे म्हणतात ते काही उगीच नाही.

आपल्या विचारात गुंग असतानाच बाजूने "आप किधर हो?" असा आवाज आला. त्याला उत्तर म्हणून "लास्ट" असे सांगून मी सज्ज झाले आणखी नवीन अनुभव घेण्यासाठी!

***- कार्तिकी अरकल,***
***प्रथम वर्ष, कला शाखा***

# शब्दशोध



आडवी विधाने:
२) एक कलादालन, बादशाह अकबरचा पुत्र
४) मुंबईचे नावाजलेले उद्योजक: जमशेदजी____
६) गिरगावातील जुने चित्रपटगृह: _____हाऊस
८) दक्षिण मुंबईतील नावाजलेले वाचनालय, रेफरन्स पुस्तकांचा खजिना
१२) बाणगंगा तलाव येथे आहे
१३) राज्यपालांचे निवास्थान
१४) मुंबईची फुफ्फुसे
१६) मुंबईकरांचा सेलिब्रिटी बाप्पा येथे विराजमान होतो
१७) राणीचा रत्नहार (इंग्रजी)
१९) प्रसिद्ध चौपाटी
२१) भारताचे प्रवेशद्वार
२३) मुंबईतील वेधशाळा
२४) महालक्ष्मीजवळील समुद्रातील दर्गा
२५) हुसेन झैदी लिखित पुस्तक, ___ टू दुबई
२७) वांद्रे-वरळी यांना जोडणारा पूल
३०) मुंबईची कुलदैवता
३२) प्रभादेवीचे प्रसिद्ध गणेश मंदिर
३३) सीएसएमटी स्थानकाजवळील नामांकित वृत्तसंस्था
३४) राजकीय मोर्चासाठी प्रसिद्ध मैदान
३५) मुंबई विद्यापीठ परिसर, मुख्यालय
३६) आयआयटी मुंबई

उभी विधाने:
१) मुंबईतील मत्स्यालय
३) विल्सन कॉलेज समोरील चौपाटी, ____गाव
५) फोर्टमधील प्रसिद्ध इराणी हॉटेल
७) महाराष्ट्राचे संसदीय भवन
८) अरबी समुद्रामधील लेणी, प्रसिद्ध त्रिमूर्ती शिल्प
९) दक्षिण मुंबईतील उच्चभ्रू निवासी भाग
१०) दादरमधील ऐतिहासिक मैदान
११) गेटवे समोरील सुप्रसिद्ध हॉटेल
१५) वांद्रे येथील जुने चर्च, देवीची वार्षिक यात्रा
१७) या टेकडीवर हँगिंग गार्डन आहे
१८) मुंबई-पुणे हायवेवर स्थित थीम पार्क
२०) फ्लोरा फाउंटन परिसर
२२) फेब्रुवारी महिन्यातील कला महोत्सव
२६) गिरगावाजवळील प्राचीन शिवमंदिर
२८) फिल्म-सिरीयल चित्रीकरणाचे ठिकाण
२९) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथे आहे
३०) सात बेटांचा समूह
३१) जिना, पायरी

# ती सुवर्ण नगरी...

सकाळी डोळे उघडताच जिथे समुद्र आणि डोंगर पाहायला मिळतात,
जिथे धारावी आणि बि.के.सी आपल्या उमेदीत दिसतात,
हिच आपली सोन्याची महानगरी।

पांढरी टोपी, पांढरा पायजमा आणि खांद्यावर १० डब्बे असलेले डब्बेवाले काका ते सूट-बूट घालून,
ब्रिफकेस पकडणाऱ्या 'सरां'पर्यंत , या शहरात सर्वांशीच भेट होईल।

लोकलचा प्रवास आणि ते बसमधले धक्के कदाचित आयुष्यातले सर्वात महत्त्वाचे धडे शिकवतात,
नकार सहन करण्यचा सराव काली-पिली वाले हमखास करुन देतात।

एक असं ठिकाण जिथे दिवाळी-दसरा, ईद-पतेती, ओणम-बैसाखी घरो-घरी त्याच उत्साहाने साजरे केले जातात,
हिंदु, मुसलमान आणि शीख गणपतीच्या रांगेत 'गणेश भक्त' ह्याच ओळखीने पहायला मिळतात।

वडापाव आणि मिसळ खाणारी मंडळी बर्गर आणि मोमोस ही खातात,
बर्फाचा गोळा, उसाचा रस, चौपाटीचा चाट आणि सोलकडी ही आवड असे सर्वांचीच।

इथे कला, रॅप आणि शास्त्रीय संगीत ह्या दोघांमध्ये आहे,
एनसीपीए आणि रंगायतन सर्वांचेच आवडते कला मंदिर आहेत।

एरवी लोकलमध्ये भांडणारी मंडळी, पूल पडल्यास किंवा पूर येताच जणू एक कुटुंब बनतात,
दहशतवादाला मात देणाऱ्या ह्या 'सिटीचं स्पिरिट' तुम्हाला कधीच विराम नाही देणार।

शेक्सपिअर तर म्हणालाच होता 'What is in the name?' तसंच आपल्या आर्थिक
राजधानीला ' मुंबई-Bombay- बंबई' किंवा काहीही म्हणा,
हि स्वप्नाची सुवर्ण नगरी प्रत्येक प्रदेशातल्या व्यक्तिला एक आपुलकीची भेट देईल!

*- ऋतुजा काळे*
*तृतीय वर्ष, कला शाखा*

# मुंबई एक स्वप्ननगरी

दाखवली वाट या नगरीने जेव्हा।
जैज्ञासिक झाल्या भावना।।
सुरू झाली स्वस्तित्वाची लढाई अन्।
पुलकित झाल्या कामना।।
दृष्टीक्षेपास पडले इथले दळणवळण जेव्हा।
मी झालो अस्वस्थ।।
पण इथे शिकल्यामुळेच।
आज मी झालो सशक्त।।
अहो जसा रामजींचा भिवा हा।
मुंबईत आल्यावर घडला।।
त्यालाच अनुमोदन देत माझ्या माय बापानं।
माझ्यातील भिवा घडवला।।
दिला आत्मविश्वास या नगरीने।
अन् मी झालो सक्षम।।
मोठमोठी स्वप्न बघा।
तेव्हाच राहू कार्यक्षम।।
मुंबईत राहिलो म्हणूनच आज।
अंधत्वावर केली मात।।
म्हणूनच मुंबई वसली आहे।
माझ्या तनामनात।।
अहो खरोखरच आहे आपली मुंबई।
एक स्वप्न नगरी।।
कारण इथे आल्यावर वाटते जणू।
मी आलोय स्वर्गलोकी।।
कितीही संकटे आली तरीही।
निडर असते इथली जनता।।
एकमेकास साहाय्य करून दाखवून देतात मुंबईकर।
स्वातंत्र्य बंधुता अन् समता।।

*- निखिल प्रमोद कोलते*
*प्रथम वर्ष, कला शाखा*

# तेजांकित


मराठी वाङ्मय मंडळ हे त्याच्या सदस्यांमुळे समृद्ध आहे आणि येणाऱ्या प्रत्येक वर्षात मंडळाची प्रगती झाली ती ह्या 'तेजांकितां'मुळेच. आज दिसणारं मंडळाचं रूप हे गेल्या अनेक वर्षांच्या कष्टाचे फळ आहे. सर्व माजी सदस्यांनी त्याचं बीज रोवलं म्हणून आज हा वृक्ष बहरत आहे. अश्याच काही माजी सदस्यांच्या आठवणी आणि मंडळाविषयीचे मनोगत ह्या सदरात कैद करण्याचा प्रयत्न केला आहे. हे सदर आम्ही मंडळाच्या सर्व आजी-माजी सदस्यांना अर्पित करत आहोत.

मी १९९१ सली संत झेवियर्स महाविद्यालयातून B.A अर्थशास्त्र ही पदवी पूर्ण केली. मी जेव्हा १९८६ मध्ये अकरावीत महाविद्यालयात प्रवेश घेतला तेव्हा मराठी वांगमय मंडळ ह्या नव्या प्रवासाला सुरुवात झाली.आम्ही काही मराठी प्रेमी ,अगदी हाताच्या बोटांवर मोजता येतील एवढेच जण अश्या उपक्रमाच्या स्थापनेसाठी झटट होतो. आम्हाला पाठींबा देणारा आमचा लाडका मित्र राजू शिंदे , महाविद्यालयाचे प्राचार्य आमच्या बरोबर होता. त्यावेळी सभासदत्व लोकांनी घेतल्यावर त्यांना पावती देता येईल एवढेही पैसे मंडळाकडे उपलब्ध नव्हते. पण आम्ही जिद्द सोडली नाही. पुढच्या वर्षी नवीन अकरावीच्या मुलांना आम्ही म. वा.म बद्दल सांगितले.त्यातील एका मुलांनी आम्हाला पावत्या छापून दिल्या आणि आम्ही आता मोठे होत होतो. आज, एवढी वर्षे उलटून गेल्यानंतर माझी मुलगी म. वा.म ची सदस्य आहे हे बघून आणि म.वा.म चा पसारा हा प्रत्येक दिवसाआड वाढत आहे हे बघून आनंद वाटतो.

*- अर्चना सावंत- महाले*

*सचिव (१९८६-८९)*





१९२३ साली स्थापित झालेल्या संत झेवियर्स कॉलेजमधील आणि मुंबईतील सर्वात जुने मराठी वांग्मय मंडळ बंद पडल्याची खंत असल्याकारणाने आम्ही; मी आणि माझी मैत्रीण (आता पत्नी) अपर्णा २००७ मध्ये मराठी वांग्मय मंडळ पुनर्स्थापित केले, पण ते गाजावाजाने यशस्वी करण्यातही सक्षम ठरलो. "आमोद" या सांस्कृतिक आणि साहित्यिक सप्ताहाची संकल्पना करून आम्ही प्रथम " आमोद" ची सुरुवात केली, तसेच " लावण्य २००७" चेही आगमन याच वर्षी झाले. आज बारा वर्षांनंतरही, हा मराठी बाणा जोमाने जोपासलेल्या आमच्या नंतरच्या 'झेवियराईट्स' चा उत्साह पाहून मला अतिशय आनंद आणि अभिमान वाटतो.

*- श्री. रायन फर्नांडिस*

*माजी अध्यक्ष (२००७)*



ज्याप्रमाणे आपल्या प्रत्येकाच्या जीवनात आई-वडील, मित्र मंडळी, शाळा- महाविद्यालय, शिक्षक परिवार, सभोवताली वातावरण आणि देवाचा आशिर्वाद महत्वाचा असतो त्यापैकीच एक म्हणजे माझ्या महाविद्यालयीन प्रवासात महत्वाचा सहवास लाभलेले संत झेवियर्स महाविद्यालयातील मराठी वाङ्मय मंडळ होय. आपल्या कल्पनेला प्रत्यक्षात कसे अनुभायचे ही संधी मंडळाने आम्हा सर्वांना उपलब्ध करून दिली.
थोडक्यात सांगायचे तर "ध्येयपूर्ती गाठण्यासाठी लागणारी सकारात्मक विचारांची अमूल्य शिदोरी म्हणजे मराठी वाङ्मय मंडळ." महाविद्यालयातील ह्या मंडळाचा मला कार्यभार सांभाळण्याची संधी मिळाली त्याबद्दल तुम्हा सर्वांचे मनःपूर्वक आभार आणि सर्वांना पुढील वाटचालीसाठी टकाटक शुभेच्छा!!!

***- अजिंक्य शिंदे***

***मुख्य सचिव - कार्यकारिणी (२०१३-१४)***

२०१२ मध्ये मी जेव्हा मराठी वांग्मय मंडळाचा सदस्य झालो तेव्हा, MVM म्हणजे काय इथपासून सुरुवात होती. पण त्यावर्षी आम्ही काही हौशी मंडळींनी ५०००/- रुपयांमध्ये पहिला आंतरमहाविद्यालयीन "आमोद" केला. एक छोटसं स्वप्न पाहिलं होतं, मराठी वांग्मय मंडळाला १०० व्या वर्षापर्यंत खूप मोठं करायचं. आणि आता ६-७ वर्षानंतर मंडळाच जसे जसे शंभरावे वर्ष जवळ येतंय, तसं मंडळाचे शेकडो सदस्य आहेत, दरवर्षी आमोद अधिकाधिक भव्य होतोय आणि असे अनेक माइलस्टोन मंडळाने गाठले आहेत. आणि मला याचा प्रचंड अभिमान आहे. माझ्यासाठी MVM एक प्रवास होता. त्या तीन वर्षात मंडळाच्या कारभारात जी काही आव्हाने आली, त्यांनी मला आयुष्यभरासाठीची शिकवण दिली आहे, ज्यासाठी मी मंडळाचा ऋणी राहीन.

***- ओम पाथरे***

***मुख्य सचिव (२०१४-१५)***



‘आमच्या ‘झेवियर्स’ला मराठी मंडळींची कौतुकास्पद सोबत आहे’ यावर कोणाचा विश्वास बसणे कठीणच! सुरुवातीला (म्हणजे अगदी १९२३ नाही तर २०१३!) ‘ह्या झेवियर्समध्ये मराठी मंडळ?’ अश्या संदिग्धतेपासून ते ‘मराठी वाङ्मय मंडळात सहभागी होण्याची धडपड’ हा असा झेवियर्सकरांच्या मानसिकतेत झालेला सुखद प्रवास अनुभवण्याचं भाग्य काही निराळंच! तेव्हा झालेली ती ‘सुरुवात’ आता उत्तमोत्तम कार्यक्रमांनी बहरत ‘आपली शतकी वाटचाल ‘तेजांकित’ करत आहे’ यावर आता सगळेच विश्वास ठेवत आहेत.

*- हर्षद पारेकर*

*(२०१३-१४: साहित्य प्रमुख; २०१४-१५: सह-संपादक; २०१५-१६: संपादक)*





मराठी वांग्मय मंडळ हे सगळ्यांना आपलंसं करून टाकणारं आमचं छोटसं कुटुंब आहे. ज्यासाठी सगळेच आपापली कामं बाजूला ठेवून हजर असतात. मी २०१३ मध्ये नाट्य हेड होते आणि त्यानंतर हेड कॉर्डिनेटर होते. सगळीच मंडळी एकमेकांना खूप सांभाळून घेतात. एखादं मंडळ किती काही करू शकतं ह्याचं उत्तम उदाहरण म्हणजे झेवियर्स कॉलेजमधलं मराठी वांग्मय मंडळ. एक नवीन कुटुंब मिळवून दिलं या मराठी वांग्मय मंडळाने!

*- जाई ठाणेकर*

*नाट्य विभागप्रमुख, (२०१३-१४)*

*हेड कॉर्डिनेटर, (२०१४-१५)*

